जा. क्र. उविमम/प्रक्षेत्र/ 643 /२०२१
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग
दिनांक 18 MAY 2021

प्रति,

........................................................

........................................................

........................................................

विषय :— भाडे तत्वावर जे. सी. बी. भाडयाने घेणेबाबत दरपत्रक पुरविणेबाबत...

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय मुळदे करीता खालीलप्रमाणे भाडे तत्वावर जे. सी. बी. मार्फत प्रक्षेत्रावर काम करुन घ्यावयाचे असून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजित कामाचे तास | शेरा |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील जमिनीचे सपाटीकरण करणे, झाडांची मुळे काढणे व झाडे लागवडीकरीता प्लॉट तयार करणे/खड्डे खणणे. | २६ | प्रति तासाचा दर नमूद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे दर नमुद करून दरपत्रक या कार्यालयात दिनांक 27/5/2021 पर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर "भाडयाने जे. सी. बी पुरविणेबाबत दरपत्रक" असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांरासहीत स्पष्टपणे नमुद करावे.
३) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग — ४१६५२० या पत्यावर पाठवावे.
४) दरपत्रकात या दरपत्रकाच्या संदर्भाचा उल्लेख असावा.
५) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७) दरपत्रकांवर जी. एस. टी. नंबर नमुद करावा. त्याचप्रमाणे दरपत्रकासोबत पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू

सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग